# ३०. वेग

गोष्ट एक श्रीमंताची आहे. त्याच्याकडे काय कमी होते ? बंगले, संपत्ती, नोकर, गाडया ...... त्याला गाडया ( कार) विकत घेण्याचा व वेगात चालविण्याचा शौक होता. एकदा हा श्रीमंत आपल्या नव्या को-या गाडीत बसून वेगात जात असतो. आजूबाजूचे बघायला वेळच नसतो. इतक्यात...... कोठून तरी एक दगड त्याच्या गाडीवर बसतो. प्रयत्नपूर्वक तो गाडी थांबवितो. गाडीला चांगलाच पोचा आलेला असतो. त्याला एकाच वेळी राग व दुःख होते. तो आजूबाजूला बघतो. दूरवरून एक लहान मुलगा त्याच्या दिशेने येत असतो. तो मुलगा सांगतो कि दगड त्यानेच मारलाय. हे ऐकताच श्रीमंताला आणखीन राग येतो. तो त्या मुलावर तोंडसुख घेतो. तो मुलगा शांत चित्ताने ऐकून घेतो व सांगतो कि सर मला पर्यायच नव्हता. माझ्या भावाला चाकाच्या खुर्ची वरून मी नेत असताना चाकाची खुर्ची कलंडल्यामुळे माझा भाऊ जमीनीवर पडलाय. मी एकटा त्याला उचलू शकत नाही. विनंती करून कोणीही गाडी थांबवली नाही आणि म्हणूनच मला हा दगड मारावा लागला.

श्रीमंत वरमतो व मुलाला मदत करतो. मुलगा त्याचे आभार मानतो व गाडीचे नुकसान झाल्याबद्यल दिलगीरी मागतो. श्रीमंत गाडीत बसतो व पुढचा प्रवास सुरू करतो पण एक निश्चय करूनच कि मी वेगवार नियंत्रण मिळविन आणि एवढया वेगाने जाणार नाही कि कोणाला माझ्यावर दगड मारावा लागेल.

मित्रांनो आवडली ना गोष्ट. अर्थातच कुठच्यातरी पेपरात किंवा मासिकात वाचलेली आहे. पण ह्या गोष्टींपासून आपल्या सर्वांना शिकण्यासारखे खूप आहे.

आज आपण सर्वजण कोठच्या तरी गोष्टीचा पाठलाग आपल्या कुवतीनुसार करत असतो. कोणी पैशाचा , कोणी पदाचा, मोठेपणाचा , वस्तुसंग्रहाचा , कलेचा , इत्यादी.

हा पाठलाग करताना आपण बरेच वेळा भोवतालची परिस्थिती विसरतो. तो एकप्रकाराने दुस-यांवर अन्यायच होतो. कारण प्रत्येक गोष्टीला २ बाजू असतात. दुस-या माणसाच्या पण काही अपेक्षा तुमच्याबद्यल असू असतात.
शेवटी मिळणारी प्रत्येक गोष्ट जर प्रमाणशीर नसेल तर सुखाची सुद्धा पूर्ण पणे चव घेता येत नाही.
वेगात असाल तर भोवतालच्या परिस्थितीची मजा घेता येत नाही. म्हणूनच म्हणतो की आपण वेगावर नियंत्रण मिळविले पाहिजे.

**Driving** च्या संदर्भात ३ गोष्टी महत्वाच्या असतात. **Accelerator, Brake, & Clutch**. **'A B C'** ही मुळाक्षरे आपण बालवयात शिकतो. पण ज्याला वेग कधी वाढवायचा. **(A)** ब्रेक लावून कधी थांबायचे **(B) &** वेग कमी कधी करायचा **(C)** हे कळेल तो आयुष्यात यशस्वी झाल्याशिवाय रहात नाही. शेवटी प्रत्येकाला आपली **Lane** ठरवता आली

पाहिजे. खूप जोराने जाऊन **Signal** पाशी **Brake** लावून थांबलात तर तुमचेच नुकसान आहे.(गाडीचे व इंधनाचे **)** पण ऐवढा संयम बाळगून आयुष्यात मार्गक्रमणा करणे फारच थोडयालोकांना जमते.

हा प्रतिकात्मक दगड तुम्हाला कळेल तो सुदीन. बघा आठवून रोजच्या घटना. मुलाची नाराजी **,** बायकोचा अबोलपणा **,** साहेबाचा बदललेला स्वर **,** सहका-यांचा असहकार. एवढेच कशाला अगदी हिशेब तपासणीसाच्या अवहाला मधील भाष्य**.**

हा दगड जर का तुम्हाला कळला **/** दिसला तर तुम्ही नक्कीच सुधारणा करू शकता. तुमच्या वागणुकीत.

असो. मग काय मित्रांनो पटतोय का हा विचार ? चाला तर मग आजच अंमलबजावणी करूया. काय म्हणालात चांगला दिवस बघुया. अहो कोणत्याही चांगल्या गोष्टीसाठी मुहूर्त बघायची गरज नसते. तरी पण आजचा दिवस चांगला आहे. ‘ संकष्टीचतुर्थी ’. चला तर मग.

**Best of Luck.**